लोकमत

# पोलिस आयुक्तांना मानवाधिकारचे समन्स

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्य मानवाधिकार आयोगाने मुंबईचे पोलिस आयुक्त देवेन भारती आणि परिमंडळ ११ चे उपायुक्त संदीप जाधव यांना समन्स बजावले आहे. २९ सप्टेंबरला या अधिकाऱ्यांनी आयोगासमोर हजर राहून साक्ष द्यावी व सीसीटीव्ही फुटेज व पुरावे सादर करावेत, असे निर्देश आयोगाने दिले आहेत. संबंधित फुटेज हे कांदिवली पोलिस ठाण्यातील आहे.

मानवाधिकार आयोगाचे अध्यक्ष निवृत्त न्यायमूर्ती अनंत बदर व सदस्य संजय कुमार यांच्या खंडपीठाने हे निर्देश




दिले आहेत. पुढील सुनावणी १ ऑक्टोबरला आहे. त्यावेळी फुटेज सादर केल्यानंतर पुढील कार्यवाही होणार आहे.

पोलिसांनी केलेल्या मारहाणप्रकरणी शुभम जयस्वाल यांनी आयोगात केलेल्या तक्रारीनंतर खंडपीठाने या प्रकरणाची चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग व पोलिस उपायुक्त परिमंडळ-११, पोलिस आयुक्त मुंबई यांनी आदेश दिले होते.

मानवी हक्क आयोगाच्या अन्वेषण विभागातर्फे कांदिवली पोलिस ठाण्याकडे केलेल्या चौकशीमध्ये १० मे २०२४ रोजीच्या या घटनेबाबत सीसीटीव्ही फुटेजची मागणी केली होती. कांदिवली पोलिसांनी आयोगाच्या अन्वेषण विभागास सहकार्य केले नाही व सीसीटीव्ही फुटेज दिले नाही.

खंडपीठाने याबाब नाराजी दर्शवून देवेन भारती व संदीप जाधव यांना हजर राहण्यास समन्स काढले आहे.

Mumbai Main
Page No. 11 Sep 20, 2025
Powered by: erelego.com